# बल्लारपूर'ची पत्रकारिता समाजात आदर्श निर्माण करणारी ठरावी

## बल्लारपूर प्रेस असोसिएशनच्या कार्यक्रमात; माजी मंत्री तथा आ. सुधीर मुनगंटीवार यांचे प्रतिपादन

बल्लारपूर ता.११:- देशाला स्वातंत्र्य मिळविण्यात पत्रकारितेचे फार मोठे योगदान आहेत. सोशल माध्यमांच्या काळात मुद्रित माध्यमांनी आपली विश्वासार्हता टिकवून ठेवली आहेत. या पत्रकारितेतून समाजातील वंचित घटकांना न्याय द्यावा. सोबतच चांगल्या कार्याची स्तुती हि व्हावी. पत्रकारिता दिशादर्शक आणि समाजात आदर्श निर्माण करणारी ठरावी. असे प्रतिपादन माजी अर्थमंत्री तथा विधिमंडळ लोकलेखा समितीचे अध्यक्ष आमदार श्री सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी व्यक्त केले. ते बल्लारपूर प्रेस असोसिएशन तर्फे आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी मंचावर बल्लारपूर प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष अजय दुबे मार्गदर्शक वसंत खेडेकर यांची उपस्थिती होती.

संघाच्या कार्याविषयी माहिती देत, वृत्तपत्राचे काम करीत असतांना, ग्रामीण वार्ताहरांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यांच्याही अडचणी समजण्याची गरज आहेत. अश्या भावना बल्लारपूर प्रेस असोसिएशन चे अध्यक्ष अजय दुबे यांनी मान्यवरांच्या समोर उपस्थित केल्या. समाजात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल शब्बीर अली, श्रुती लोणारे, आणि बाबूसिंग बिलारिये यांचा शाल-श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन उभयतांना गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन योगेश खेडेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन मंगेश बेले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीनिवास कंदकुरी, अनिल पांडे, गणेश रहिकवार, संजय कुमार पोद्दार, राजेश खेडेकर यांनी परिश्रम घेतले